**सेवा विषयक बाबीसंबंधीची प्रकरणे.**
**मा.मुख्यमंत्र्यांना सादर करणे आणि सामान्य प्रशासन विभागास दाखविणे आवश्यक असणा-या प्रकरणांची यादी.**

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२००५/प्र.क्र.५/०५/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६.६.२००६.

वाचा- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दि.२४.७.७५,
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७५/दहा, दि.१२.१२.७५,
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०७८/दहा, दि.१३.११.७८,
(४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०९०/प्र.क्र.१/९०/१२, दि.१०.५.१९९०,
(५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.एसआरव्ही-१०९०/प्र.क्र.१/९०/१२, दि.२९.४.१९९२.

## परिपत्रक

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०७५/१०, दिनांक २४.७.१९७५ आणि वर उल्लेख केलेल्या निरनिराळया परिपत्रकान्वये केलेल्या सुधारणांसह शासन सेवेतील सेवकांच्या सेवाविषयक बाबीसंबंधीची कोणती प्रकरणे मा.मुख्यमंत्र्यांना सादर करणे आवश्यक आहे, कोणती प्रकरणे सामान्य प्रशासन विभागास दाखविणे आवश्यक आहे व कोणती प्रकरणे दाखविणे आवश्यक नाही, याबाबतच्या सूचना मंत्रालयीन विभागांना दिलेल्या आहेत. आता उपरोल्लेखित परिपत्रकांचा सर्वंकष आढावा घेऊन, या सर्व आदेशांचा एकत्रितपणे विचार करुन, त्यात दरम्यानच्या काळात झालेल्या प्रशासकीय सुधारणा आणि अधिकारांचे केलेले प्रत्यायोजन लक्षात घेऊन वरील आदेशांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. तसेच पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार वेतनाच्या किमान टप्प्यांमध्ये झालेले बदल विचारात घेऊन, या प्रकरणी वित्त विभागाचे आणि सामान्य प्रशासन विभागाच्या सेवा विभागातील कार्यासनांचे अभिप्राय घेऊन पूर्वी केलेल्या वर्गीकरणात सुधारणा करुन विवरणपत्र 'अ', 'ब', 'क' व 'ड' सुधारित करण्यात आली आहेत.

२. सर्व मंत्रालयीन विभागाना कळविण्यात येते की, मा.मुख्यमंत्री आणि सामान्य प्रशासन विभागास सेवाविषयक प्रकरणे सादर करताना सोबत जोडलेल्या विवरणपत्र 'अ', 'ब', 'क' व 'ड' मध्ये दिलेल्या प्रकरणांच्या सुधारित सूचीनुसार कार्यवाही करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०६२९१५५१४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.कृ.लोखंडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

# <u>विवरणपत्र 'अ'</u>

***<u>अंतिम निर्णयासाठी मा.मुख्यमंत्र्यांना सादर करावयाची सेवाविषयक बाबींची प्रकरणे :-</u>***

१ अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या, तसेच राज्य सेवेतील विभाग प्रमुख / प्रादेशिक विभाग प्रमुख किंवा ज्या पदाच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१०६५०/- आहे, त्या किंवा त्यापेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन घेणारे गट 'अ' चे इतर अधिकारी यांच्या नेमणुका, बदल्या, पदस्थापनेची प्रकरणे.

२ मंत्रालयीन सेवेतील उपसचिव व त्यापेक्षा वरील दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पदस्थापना.

३ अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे तसेच विभागीय/प्रादेशिक विभागप्रमुख दर्जाचे तसेच त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी, विविध महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि रु.१०६५०/- हा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीतील गट 'अ' मधील सर्व अधिकाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे.

४ सामान्य प्रशासन विभागाने सेवाविषयक बाबींच्या मंत्रालयीन विभागांच्या प्रकरणांत दिलेला सल्ला, मंत्रालयीन विभागांच्या स्तरावर किंवा प्रभारी मंत्र्यांच्या स्तरावर अस्वीकृत करावयाची प्रकरणे.

५ राज्य सेवेतील विभागप्रमुख व त्या दर्जाचे प्रादेशिक विभागप्रमुख; विविध महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि रु.१६४००/- हा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीतील गट 'अ' मधील इतर सर्व अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल. (अखिल भारतील सेवेमधील अधिकाऱ्यांबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी म्हणजे सामान्य प्रशासन विभाग, गृह आणि महसूल व वन विभाग यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.)

६ गट 'अ' मधील अधिकाऱ्यांविरुद्धच्या विभागीय चौकशी पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा ३ वर्षांच्या पुढे वाढवून देण्याची प्रकरणे.

७ सेवानिवृत्तीनंतरची पुनर्नियुक्ती, कंत्राटी पद्धतीवर करण्यात येणाऱ्या नियुक्तीसंबंधीची प्रकरणे.

८ सेवाविषयक नियम, शासन निर्णय / आदेश यामधील तरतूदीत शिथिलता देण्याची प्रकरणे.

९ राजपत्रित गट-अ व गट-ब ची आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित (de-reserve) करण्यासंबंधीचे तसेच राजपत्रित गट-अ व गट-ब च्या निवडसूचीतील मागासवर्गीयांच्या अधिक्रमणास मान्यता देण्याचे प्रस्ताव

## विवरणपत्र 'ब'

**शासनाचे आदेश प्राप्त करण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय मिळविणे आवश्यक असलेली प्रकरणे:-**

१ सेवाविषयक नियम किंवा शासन निर्णय/आदेशात शिथिलीकरण अपेक्षित असलेली प्रकरणे.

२ विहित कार्यपद्धती अनुसरुन मान्य झालेल्या निवडसूचीतील किंवा आस्थापना मंडळाच्या शासनाने मान्य केलेल्या शिफारशीव्यतिरिक्त इतर प्रकरणात राजपत्रित पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची प्रकरणे.

३ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील परंतु आयोगाच्या सहमतीशिवाय देण्यात आलेल्या पदोन्नत्या १ वर्षापेक्षा पुढे चालू ठेवण्याबाबतची प्रकरणे.

४ आस्थापना मंडळांना सादर करावयाचे प्रस्ताव.

५ आस्थापना मंडळाच्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणांखेरीज; भारतीय प्रशासन सेवेतील आणि राज्य सेवेतील इतर राजपत्रित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण; फेलोशिप साठी पाठवावयाची प्रकरणे.

६ गट 'अ' मधील अधिकाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे (शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करतांना तसेच शिक्षेचे प्रस्ताव अंतिम करतांना अशा दोन्ही वेळेस)

७ राजपत्रित गट 'ब' अधिकाऱ्यांच्या ज्या शिस्तभंगविषयक प्रकरणात जबरी शिक्षा प्रस्तावित आहे अशी प्रकरणे (अंतिम टप्प्यात)

८ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या नियम ७ (६) खालील तरतुदीनुसार जेथे शिस्तभंगविषयक प्राधिकरण हे शासन असेल तेथे मंजूर करावयाचे अनुकंपा निवृत्तीवेतन (Compassionate Pension)

९ विभागीय चौकशी नियमपुस्तिका, १९९१ च्या परि.३.१९ नुसार विभागीय चौकशीच्या प्रकरणात चौकशा पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा वाढविण्याबाबतची प्रकरणे.

१० राजपत्रित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याची प्रकरणे तसेच म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमातील नियम ३२ चे शिथिलीकरण अपेक्षित असलेली अराजपत्रित कर्मचाऱ्यांची मानीव दिनांकाची प्रकरणे.

११ शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीनंतर पुनर्नियुक्ती / कंत्राटी पद्धतीवर करण्यात येणाऱ्या नियुक्त्या.

१२ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्याची प्रकरणे.

१३ सेवाविषयक बाबींची प्रकरणे विचार विनिमयासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठवावयाचे प्रस्ताव / पत्रे.

१४ अंतिम निर्णयासाठी मा.मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात येणारी प्रकरणे, त्यात सेवाविषयक व आरक्षणविषयक बाबी अंतर्भूत असल्यास त्या अनुक्रमे अपर मुख्य सचिव (सेवा)/अपर मुख्य सचिव (सा.वि.स.)/प्रधान सचिव यांचेमार्फत मा.मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात यावीत.

१५ मंत्रालयीन विभागातील व विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील सर्व संवर्गातील आरक्षित पदे तात्पुरत्या स्वरुपात अनारक्षित (de-reserve) करण्यासंबंधीचा प्रस्ताव.

१६ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवायची मागणीपत्रे.

## विवरणपत्र 'क'

### *मा.मुख्यमंत्र्यांना सादर करण्याची आवश्यकता नसलेली प्रकरणे.*

१ विभागीय, प्रादेशिक विभाग प्रमुख आणि वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.१०६५०/- पेक्षा कमी असलेल्या गट 'अ' मधील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, पदस्थापना आणि बदल्यांची प्रकरणे.

२ विभागप्रमुख आणि मंत्रालयातील सचिवांपेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या रजेची तसेच त्या काळातील कामाचा अतिरिक्त कार्यभार इ.व्यवस्था करण्याची ज्यामध्ये दीर्घ मुदतीची पदोन्नती उद्‌भवत नसतील अशी प्रकरणे.

३ मंत्रालयातील अवर सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्यांची प्रकरणे.

४ राज्य सेवेतील अधिकारी / विभागीय / प्रादेशिक विभाग प्रमुख / विविध महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, तसेच रु.१६४००/- किंवा त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणीचा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीतील वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर राजपत्रित अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल.
(अखिल भारतील सेवेमधील अधिकाऱ्यांबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी म्हणजे सामान्य प्रशासन विभाग, गृह आणि महसूल व वन विभाग यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.)

५ ज्या प्रकरणात दक्षतारोध पार न करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेतलेली असेल अशी प्रकरणे.

६ अखिल भारतीय सेवेतील अधिकारी किंवा विभागीय किंवा प्रादेशिक विभाग यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी, विविध महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक आणि रु.१०६५०/- वेतनश्रेणीचा किमान टप्पा असलेल्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर अधिकाऱ्यांची शिस्तभंग विषयक प्रकरणे.

७ विभाग प्रमुख व त्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या रजा मंजुरीची प्रकरणे

८ गट 'अ' च्या अधिकाऱ्यांना निवृत्तीपूर्व रजा नामंजूर करावयाची प्रकरणे.

## विवरणपत्र 'ड'

### *सामान्य प्रशासन विभागाला सादर करण्याची आवश्यकता नसलेली प्रकरणे*

१ बदल्यांच्या कायद्यामधील तरतूदीनुसार बदली करण्यासंबंधीची प्रकरणे.

२ राजपत्रित अधिकाऱ्यांना दक्षतारोध पार करण्याची अनुमती देण्यासंबंधीची प्रकरणे.

३ गट 'अ' व 'ब' च्या अधिकाऱ्यांना दक्षतारोध ओलांडण्यास अनुमती न देण्याची प्रकरणे

४ मान्य झालेल्या निवडसूचीतील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतची प्रकरणे.

५ राजपत्रित अधिकाऱ्यांचेबाबत निवृत्तीपूर्व रजा नामंजूर करण्याच्या प्रकरणाव्यतिरिक्त राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजेची इतर प्रकरणे.

६ गट 'ब' मधील अधिकाऱ्यांच्याबाबत निवृत्तीपूर्व रजा नाकारण्याची प्रकरणे

७ अराजपत्रित कर्मचाऱ्यांविरुद्धची शिस्तभंगविषयक प्रकरणे.

८ अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्याने आदेशाचा भंग केल्यामुळे शासनाला झालेल्या कोणत्याही आर्थिक स्वरुपाच्या हानीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा भाग त्यांच्या वेतनातून वसूल करणे या शिक्षेव्यतिरिक्त किरकोळ शिक्षा देण्याचे प्रस्तावित असलेल्या राजपत्रित अधिकारी गट 'ब' अधिकाऱ्यांची शिस्तभंगविषयक प्रकरणे

९ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत नसलेल्या पदांकरिता मागणीपत्र संबंधित प्रधिकाऱ्यांना पाठविण्याबाबतची प्रकरणे.

१० राजपत्रित कर्मचाऱ्यांना त्यांच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविणेबाबत.

११ राजपत्रित अधिकाऱ्यांचेबाबतीत त्यांचा परिविक्षा कालावधी (१ वर्षे) पुढे वाढविण्याची किंवा त्यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्याची प्रकरणे.

१२ गट 'अ' व 'ब'च्या राजपत्रित परिविक्षाधीन अधिकाऱ्याला परिविक्षा कालावधी समाधानकारक नसल्याच्या कारणास्तव सेवेतून मुक्त करणे.

१३ शासकीय कर्मचाऱ्याला राज्यात प्रशिक्षण देण्याची प्रकरणे.

१४ चारीत्र्य व वर्तणुक याची पडताळणी करण्याची प्रकरणे.

१५ चर्चासत्रे आणि परिषदा यांना उपस्थित राहण्यास अनुमती देण्याची प्रकरणे.

१६ अधिकारी/कर्मचाऱ्याची ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे व ज्येष्ठतेचे विनियमन नियमानुसार ज्येष्ठतेबाबतची अभिवेदने निकालात काढणे.

१७ राजपत्रित अधिकाऱ्यांना सेवेत कायम (Confirm) करण्याची प्रकरणे.

१८ राजपत्रित अधिकाऱ्याच्या राजीनाम्याची प्रकरणे.

१९ म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियमातील नियम ३२ चे शिथिलीकरण प्रस्तावित नसलेली अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे मानीव दिनांक देण्याची प्रकरणे.

२० महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविलेल्या प्रस्तावासंबंधी आयोगाने मागणी केलेली अतिरिक्त माहिती आयोगास पाठविण्याची प्रकरणे.

२१ अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्याची प्रकरणे.